ePaper

| वर्ष - 6 । अंक - 54 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 29 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ठाण्यातील ठाकूर इंजिनिअरींग कंपनीला आग, 8 सिलेंडरचे स्फोट!



## आतील पानांत


- पुणे, पिंपरी-चिंचवडसाठी शिवसेना एकमेव पर्याय !
- भारतातील सर्वांत मोठ्या बैलगाडा शर्यतीची परदेशी प्रेक्षकांनाही भुरळ!
- संभाजीराजेंनी अपक्ष लढावं हा तर विरोधी पक्षनेते देवेंद्र ....




देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर संभाजीराजेंनी स्वराज्य संघटना काढली. त्यामुळे स्वबळावर पुढे जाने किंवा इतर पक्षांचा पाठिंबा घेणे हे दोन पर्याय त्यांच्याकडे होते. मागच्यावेळी त्यांना राष्ट्रपती नियुक्त खासदारकी घेताना ती घेऊ नये असे मत आम्ही मांडले होते. मात्र, त्यांनी तो निर्णय वैयक्तिक घेतला. त्यानंतर आतार्यंत त्यांनी जी राजकीय पाऊले उचलली त्यात कुठेही आमच्याशी अथवा घरच्यांशी त्यांनी चर्चा केलेली नाही.

- **छत्रपती शाहू महाराज**, कोल्हापूर

हे स्पष्ट दिसत होते की कोणीतरी संभाजीराजेंना पुढे करून महाराष्ट्रात एक वेगळ्या प्रकारचा डाव खेळण्याचा प्रयत्न करत होते. हा डाव नव्हता तर कपट होते. पण ते कपट काय होते. हे आज स्वत: छत्रपती शाहू महाराज यांनी स्पष्ट केले. म्हणून आजही महाराष्ट्र शाहू महाराजांपुढे झुकतो. त्यांच्या कुटंबापुढे झुकतो. त्याचे कारण हेच आहे. सत्याची कास आणि प्रामाणीकपणा. महाराष्ट्रापुढे जेव्हा जेव्हा संकट आले तव्हा शाहू घराण्याने भूमीका घेतली आहे.

- **संजय राऊत**, शिवसेना नेते



### नालेसफाईचे उर्वरित काम युद्धपातळीवर पूर्ण करा

# पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित ठेवा !

### सफाईविषयी आढावा बैठकीत आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांचे आदेश

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पावसाळी** पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा ठरेल अशी कोणतीही कृती केल्यास आपत्ती उद्भवू शकते. त्यामुळे नदी नाल्यांचे व्यवस्थित संरक्षण करून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित ठेवला पाहिजे. नालेसफाईचे काम जवळपास पूर्ण झाले असल्याची माहिती क्षेत्रीय अधिका-यांनी दिली. उर्वरीत काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश, आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी दिले. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आयुक्त राजेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नाले सफाईविषयी आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.के. अनिल रॉय, शहर अभियंता राजन पाटील, मुख्यलेखाधिकारी जितेंद्र कोळंबे, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, सहआयुक्त आशादेवी दुरगुडे, सहशहर अभियंता मकरंद निकम, श्रीकांत सवने, अशोक भालकर, रामदास तांबे, संदेश चव्हाण, संजय खाबडे, उपायुक्त चंद्रकांत इंदलकर, मनोज लोणकर, संदीप खोत, विठ्ठल जोशी आदींसह विविध अधिकारी उपस्थित होते.



#### क्षेत्रीय अधिकार्यांसोबत बैठक उत्साहात

दरम्यान, आयुक्त पाटील यांनी सर्व क्षेत्रीय अधिका-यांसमवेत बैठक घेऊन नालेसफाईच्या कामकाजाचा आढावा घेतला. नालेसफाईचे काम जवळपास पूर्ण झाले असल्याची माहिती यावेळी क्षेत्रीय अधिका-यांनी दिली. उर्वरीत काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त पाटील यांनी या बैठकीत उपस्थित अधिका-यांना दिले. या बैठकीस आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.के. अनिल रॉय, सहशहर अभियंता रामदास तांबे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, क्षेत्रीय अधिकारी शितल वाकडे, अभिजित हराळे, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, सीताराम बहुरे, विजयकुमार थोरात उपस्थित होते.

पावसाळ्यात बऱ्याच ठिकाणी पाणी तुंबल्याच्या घटना घडतात. तेंव्हा नागरिक महापालिकेला दोष देतात. त्यामुळे वेळोवेळी या बाबींकडे लक्ष दिले पाहिजे. स्टॉर्म वॉटर वाहिन्यांचे चोकअप काढले पाहिजे, पाणी वाहून जाण्याची छिद्रे अथवा पाईप काही कारणास्तव बुजले गेल्यास तेथे पाणी तुंबते. त्यामुळे सातत्याने पाहणी करून कोठेही पाणी तुंबणार नाही याची दक्षता घ्यावी. शिवाय वेळोवेळी नाले सफाई होणे आवश्यक आहे. प्रत्येक नाल्यासंदर्भात वेगळ्या समस्या असतात, त्यांचा अभ्यास करून सफाईच्या कामाचे योग्य नियोजन केले पाहिजे. या सफाईच्या कामासाठी पालिकेच्या सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करावे. या कामासाठी आवश्यक जेसीबी, पोकलेन, डंपर आदी मशिनरी संबंधित विभागाने वेळेत उपलब्ध करून द्यावी.

- **राजेश पाटील**, आयुक्त

# वीजबिलाचा भरणा करण्याशिवाय तरणोपाय नाही

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची स्पष्टोक्ती

**। पुणे । महाईन्यूज ।**

**वीजबिल** भरल्याशिवाय...' अजित पवारांचं जिल्हा विद्युत समितीच्या बैठकीत मोठं विधान. विजेची मागणी वाढत असताना त्यासाठी पायाभूत यंत्रणा उभारण्यात येत आहेत. मात्र, वीजबिलांची वसुली न झाल्यास सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आर्थिक अडचणी येतात. विजेची मागणी



वाढत असताना त्यासाठी पायाभूत यंत्रणा उभारण्यात येत आहेत. मात्र, वीजबिलांची वसुली न झाल्यास सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आर्थिक अडचणी येतात. महावितरण कंपनीची स्थिती सध्या अशीच आहे.त्यामुळे वीजबिलाचा भरणा करण्याशिवाय तरणोपाय नाही, अशी स्पष्टोक्ती उपमुख्यमंत्री आणि जिल्हा विद्युत वितरण नियंत्रण समितीचे अध्यक्ष अजित पवार यांनी केली. लोकप्रतिनिधींनीही नागरिकांना वीजबिल भरण्याची आवश्यकता समजून सांगावी, असे आवाहनही पवार यांनी केले. जिल्हा विद्युत वितरण नियंत्रण समितीची बैठक शनिवारी पुण्यात झाली. त्या वेळी अजित पवार बोलत होते. पवार यांनी जिल्ह्यातील वीज यंत्रणेचा आणि सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामाचा बैठकीत आढावा घेतला. ते म्हणाले, की वीजक्षेत्रात आर्थिक शिस्त अतिशय महत्त्वाची आहे.

- राज्य शासनाने कृषिपंप वीजजोडणी धोरणातून व्याज, विलंब आकार माफीसह मूळ थकबाकीमध्ये ५० टक्के सवलत दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना थकबाकी मुक्तीसाठी मोठी संधी आहे.
- उपकेंद्रांपासून ते नवीन वीजजोडणी देण्यापर्यंत सर्वच वीजयंत्रणा उभारण्याचे कामे सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले. आमदार अशोक पवार, चेतन तुपे, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, संजय जगताप, सुनील टिंगरे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, महावितरणचे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे, मुख्य अभियंता सचिन तालेवार (पुणे परिमंडल), सुनील पावडे (बारामती परिमंडल), जयंत विके (महापारेषण), समितीचे अशासकीय सदस्य प्रवीण शिंदे, प्रदीप कंद, अरुण बोऱ्हाडे, रवींद्र गायकवाड, रमेश अय्यर, सुनील गायकवाड आदी बैठकीला उपस्थित होते.

## शॉर्ट न्यूज »

### बीए. ४ आणि बीए. ५ प्रकारचे पुण्यात सात रुग्ण



पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

करोनाच्या ओमायक्रॉन विषाणूचे नवे उत्परिवर्तन असलेल्या बीए.४ आणि बीए.५ चे रुग्ण आता महाराष्ट्रात आढळले आहेत. या प्रकारांचे एकूण सात रुग्ण पुणे शहरात आढळून आले आहेत. पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या समन्वयाने सुरु असणाऱ्या जनुकीय क्रमनिर्धारण सर्वेक्षणाच्या ताज्या अहवालानुसार ही माहिती समोर आली आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने शनिवारी आपल्या दैनंदिन अहवालातून याबाबत माहिती दिली आहे. भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेने (आयसर) केलेल्या जनुकीय तपासणीत हे नवे प्रकार आढळले असून इंडियन बायोलॉजिकल डेटा सेंटर (आयबीडीसी) फरिदाबाद या संस्थेने याची पुष्टी केली आहे. राज्याचे साथरोग सर्वेक्षण अधिकारी डॉ. प्रदीप आवटे म्हणाले, हे सर्व रुग्ण पुणे शहरातील आणि ४ मे ते १८ मे

### खडकवासला मतदार संघात शिवसंपर्क अभियान

# पुणे, पिंपरी-चिंचवडसाठी शिवसेना एकमेव पर्याय !

### रामटेकचे शिवसेना खासदार कृपाल तुमाने यांनी व्यक्त केले मत



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

भाजपला पुणेकरांनी महानगरपालिकेत संधी दिली मात्र, त्यांनी विकासाच्या कामांना पुरेसा न्याय दिला नाही. त्यामुळे सुज्ञ पुणेकरांनी शिवसेनेला संधी द्यावी. मुंबई महानगरपालिका प्रमाणेच पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्ही पालिकेत शिवसेना हा एकमेव पर्याय आहे, असे मत रामटेकचे शिवसेना खासदार कृपाल तुमाने यांनी व्यक्त केले.

शिवसंपर्क अभियानातील दुसरा टप्पा सध्या सुरू आहे. यात नऱ्हे येथील शताक्षी हॉल येथे खडकवासला मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत आयोजन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी संपर्क प्रमुख सचिन अहिर, खडकवासला विधानसभाप्रमुख नितीन वाघ, विभागप्रमुख निलेश गिरमे, महेश पोकळे, ललिता कुटे, भरत कुंभारकर, गोकुळ करांजवने, महेश विठे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सचिन अहिर म्हणाले, शिवसंपर्क अभियानाद्वारे पक्ष संघटन मजबूत करताना सक्रिय कार्यकर्त्यांना ताकद देण्याचा प्रयत्न करत आहोत. आगामी काळात शिवसेनेचे अनेक मंत्री पुणे आणि पिंपरी चिंचवड या ठिकाणी दौरे करताना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करणार आहेत.

#### खडकवासला मतदारसंघात किमान सहा जागावर विजयाची शक्यता : रमेश कोंडे, जिल्हाध्यक्ष

खडकवासला मतदारसंघात शिवसेनेची ताकद आहे. आगामी काळातील महत्त्वाच्या मंत्र्यांच्या दौऱ्यांमुळे सक्रिय कार्यकर्ते पक्षाची कामे मतदारांपर्यंत नक्कीच पोचावतील, यामुळे आगामी पालिका निवडणुकीत खडकवासला मतदार संघातून किमान ६ जागांवर शिवसेनेचे उमेदवार विजयी होवू शकतात, अशी आशा जिल्हाध्यक्ष रमेश कोंडे यांनी व्यक्त केली.

### भूमिगत वीजवाहिनी तोडल्याने सदाशिव पेठ, टिळक रस्ता अंधारात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

टिळक रस्त्यावर भूमिगत सांडपाणी वाहिन्यांसाठी ठेकेदाराकडून करण्यात येणाऱ्या खोदकामात शुक्रवारी मध्यरात्री उच्चदाब भूमिगत वीजवाहिनी तोडण्यात आली. त्यामुळे सदाशिव पेठ, टिळक रस्ता आणि नवी पेठेतील बहुतांश भाग अंधारात बुडाला. पर्यायी व्यवस्थेतून रात्री काही भागांत वीज आली असली, तरी सुमारे १८०० ग्राहकांची वीज दीर्घकाळ गायब होती. रात्रभर दुरुस्तीचे काम करून शनिवारी दुपारच्या सुमारास या भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले. टिळक स्मारक मंदिराजवळ भूमिगत सांडपाणी वाहिन्या बदलण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी जेसीबीने खोदकाम करण्यात येत आहे. त्यामध्ये शुक्रवारी रात्री बाराच्या सुमारास महावितरणची भूमिगत वीजवाहिनी तोडण्यात आल्याने सदाशिव पेठ, टिळक रोड आणि नवी पेठ परिसरातील २५ रोहित्रांवरील वीजपुरवठा खंडित झाला होता. महावितरणने सर्वप्रथम २५ पैकी १२ रोहित्रांचा वीजपुरवठा पर्यायी व्यवस्थेतून सुरू केला.

### आगीत सुमारे 25 लाखाचे नुकसान

# तळेगाव ढमढेरे येथे फर्निचरचे गोडाऊन आगीत खाक

### गावातील नागरिक व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात घटनास्थळी केली गर्दी

तळेगाव ढमढेरे । महाईन्यूज । प्रतिनिधी

तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील जय गुरुदत्त फर्निचरच्या गोडाऊनला शनिवारी 22 मे रोजी दुपारच्या सुमारास आग लागून सुमारे २५ लाखाचे नुकसान झाले असल्याची प्राथमिक माहिती आहे. यासंदर्भात फर्निचर गोडाऊनचे मालक मनीष महेश मेटे यांनी माहिती दिली. फर्निचरच्या गोडाऊनमध्ये असलेले सर्व लाकडी व लोखंडी साहित्याचे फर्निचर तसेच हार्डवेअर व विविध प्रकारच्या मशीन तसेच एक दुचाकी आणि पत्रा शेड आदी मालमत्ता जळून खाक झाली आहे. आगीची माहिती मिळताच गावातील नागरिक व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात घटनास्थळी जमा झाले.

यामध्ये संजय गांधी योजनेचे तालुकाध्यक्ष ॲड सुदीप गुंदेचा, माजी अध्यक्ष संदिपअण्णा ढमढेरे, चिंतामण ढमढेरे, पोलीस पाटील पांडुरंग नरके, माजी उपसरपंच प्रमोद ढवळे, रोहिदास ढमढेरे, हरिभाऊ ढमढेरे यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

आगीची माहिती कळताच रांजणगाव एमआयडीसीतील अग्निशमन दल व पीएमआरडीए च्या अग्निशमन दलाने आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. मात्र उष्णतेमुळे आगीने रुद्र रूप धारण केले होते. अग्निशमन दलाला दोन तासात आग विझवण्यात यश आले. या आगीमध्ये सर्व फर्निचर जळून खाक झाले असून सुदैवाने जीवित हानी झाली नाही. दरम्यान, तळेगाव ढमढेरे येथे गेल्या पंधरा दिवसातील ही दुकानाला लागलेली दुसरी आग असून पंधरा दिवसापूर्वी मुख्य बाजारपेठेतील एका घराला आग लागून मोठे नुकसान झाले होते.



#### अग्निशामक दलाच्यामुळे अनर्थ टळला

१५ दिवसानंतर आज पुन्हा मुख्य बाजारपेठेतील फर्निचरच्या गोडाऊनला आग लागल्याने नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे. प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन त्वरित पंचनामा करावा आणि नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी मनिष मेटे यांनी केली आहे. दरम्यान, आगीच्या संदर्भात ॲड. सुदीप गुंदेचा यांनी आमदार अशोक पवार यांच्याशी संपर्क साधला आणि आमदार अशोक पवार यांनी फोनवरून संपर्क करून रांजणगाव एमआयडीसी व पीएमआरडीएच्या अग्निशमन दलाला त्वरित पाचारण केल्याने पुढील अनर्थ टळला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### गुन्हा दाखल केल्याच्या रागातून पतीची पत्नीला मारहाण

।पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी ।

मुलाने स्विफ्ट गाडी घेतल्याने आणि पोलिसात गुन्हा दाखल केल्याच्या रागातून पतीने मुलाला, पत्नीला मारहाण केली. घराच्या हॉलच्या, बेडरुमच्या काचा, जाळी तोडली. ही घटना शुक्रवारी (दि.27) नेवाळेवस्ती, चिखली येथे घडली. याप्रकरणी पत्नीने चिखली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार पती शंकर चिमनराव नेवाळे (वय 37, रा. नेवाळेवस्ती, चिखली) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी व आरोपी नात्याने पती-पत्नी आहेत. पती वेळोवेळी मानसिक, शारिरीक त्रास देत असल्याने पत्नीने चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. सध्या फिर्यादी पत्नी व आरोपी पती एकमेकांच्या शेजारी राहतात. फिर्यादी यांना नातेवाईकांच्या लग्नाला जायचे होते. त्यासाठी त्यांनी त्यांचा मुलाला स्वीफ्ट गाडी आणण्यासाठी सांगितली. मुलाने स्वीफ्ट गाडी घेतल्याने आणि पूर्वीच्या गुन्ह्याच्या राग धरुन आरोपीने मुलाला हाताने मारहाण केली. फिर्यादीच्या घराच्या हॉलच्या, बेडरुमच्या काचा, जाळी तोडली. तसेच तुळशी रुंदावन उचकटून आरोपीने फिर्यादीच्या दिशेन दगड फेकून मारला. चिखली पोलीस तपास करत आहेत.

### महाराष्ट्राची अस्मिता बैलगाडा शर्यत झाली आता 'ग्लोबल'

# भारतातील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीची परदेशी प्रेक्षकांनाही भुरळ!

### दुसऱ्या दिवशी सुमारे 15 हजार बैलगाडा प्रेमींची हजेरी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत आता 'लोकल टू ग्लोबल' असा प्रवास करताना दिसत आहे. महाराष्ट्राचा हा रांगडा खेळ पाहण्यासाठी विदेशी प्रेक्षकांनी हजेरी लावली. नेदरलँडमधील तीन प्रेक्षकांनी घाटात उपस्थित राहून बैलागाडा शर्यतींचा थरार अनुभवला. भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आणि माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव यांच्या नियोजनातून भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत टाळगाव चिखली येथील रामायण मैदानावर सुरू आहे. या शर्यतींचे संयोजन जय हनुमान बैलगाडा मंडळ, राहुलदादा जाधव बैलगाडा मंडळाने केले आहे.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी शनिवार असल्यामुळे बैलगाडा शौकींनांसह सर्वसामान्य नागरिकांनी रामायण मैदानावर मोठी गर्दी केली होती. चाकण औद्योगिक पट्ट्यातील





जीकेएन एरोस्पेस कंपनीचे संचालक असलेली तीन विदेशी नागरिक बैलगाडा शर्यतीला उपस्थित राहिले. मार्टिन दुर्विले, जोस्ट दुर्विले आणि युस्ट कम्पहुइस अशी तिघांची नावे आहेत. भारतीय संस्कृतीप्रमाणे महाराष्ट्रीय फेटा बांधून स्वागत करण्यात आहे. पाहुण्यांना अगदी वाजत-गाजत घाटात आणण्यात आले. उपस्थित श्रोत्यांनी जल्लोष करीत विदेशी पाहुण्यांचे स्वागत केले, अशी माहिती जय हनुमान बैलगाडा मंडळ व उत्सव समितीचे अध्यक्ष हनुमंत जाधव यांनी दिली.

मार्टिन दुर्विले म्हणाले की, एवढ्या मोठ्या प्रमाणात होणारी बैलगाडा शर्यत मी प्रथमच अनुभवत आहे. महाराष्ट्रातील नागरिकांनी आमचा सन्मान केला. या सन्मानाने आम्ही भारावून गेलो. इथली संस्कृती आम्हाला भावते. बैलांप्रति इथल्या लोकांना असलेला जिव्हाळा कौतुकास्पद आहे.

### बैलगाडा शौकिनांसाठी दर्जेदार मेजवानी...

ग्रामीण संस्कृतीला साजेसी मेजवानी असल्यामुळे बैलगाडा शौकीनांनी समाधान व्यक्त केले सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत दिवसभर स्पर्धा होणार असल्यामुळे . रामायण मैदानावर जेवणाची खास व्यवस्था केली आहे. शनिवारी शौकीनांना जेवनासह बुंदी आणि मठ्ठ्यावर ताव मारला. विशेष म्हणजे, दुपारी तीन वाजता घाटात उपस्थित असलेल्या प्रेक्षकांना कलिंगडाचा मोफत आस्वाद घेता आला. उन्हाची तीव्रता जाणवू नये, यासाठी प्रेक्षक गॅलरीमध्ये गारवा निर्माण करणारे शॉवर बसवले आहेत. अस्सल ग्रामीण बाज असलेली बैलगाडा शर्यत अत्यंत दमदार आयोजन केल्यामुळे बैलगाडा शर्यतप्रेमींकडून समाधान व्यक्त होत आहे.

### पिंपरी महापालिकेचा आदर्शवत निर्णयाचे होतेय स्वागत

# कौतुकास्पद निर्णय! तृतीयपंथीय होणार आता रखवालदार, मदतनीस !

### पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांची मंजुरी

पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

पिंपरी-चिंचवड शहरात विविध ठिकाणी जिजाऊ क्लिनिक सुरु करण्यास तसेच तृतीयपंथीयांना रखवालदार, मदतनीस व ग्रीन मार्शल पथकातील कामकाजाकरीता नेमणूक करण्यास प्रशासक राजेश पाटील यांनी नुकतीच मंजुरी दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तपदी राजेश पाटील यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी सुरुवातीपासूनच समाजातील वंचित घटकांना समाजामध्ये सामावून घेण्यासाठी सकारात्मक दृष्टीने विचार असल्याचे सांगितले होते. त्या दृष्टीने त्यांनी तृतीयपंथीयांना रखवालदार मदतनीस , ग्रीन मार्शल पथकातील कामकाजाकरिता नेमणूक करण्यासाठी मंजुरी दिली आहे. यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा हा निर्णय राज्यातील महानगरपालिकांना आदर्शवत ठरणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये सुमारे 200 च्या आसपास उद्याने आहेत. याशिवाय महापालिकेच्या विविध



प्रकल्पांसाठी इमारती कार्यान्वित आहेत. महापालिकेच्या हद्दीतील रस्ते अशा अनुषंगिक बाबींसाठी रखवालदार तसेच मदतनीस म्हणून हे तृतीयपंथीय काम पाहतील असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### झिरो वेस्ट प्रकल्पाला मंजुरी



महापालिकेच्या शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर झिरो वेस्ट प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पासाठी येणाऱ्या खर्चास तसेच सॅनिटरी नॅपकीन व्हेंडिंग मशीन आणि सॅनिटरी नॅपकीन इन्सिनेरेटर मशीन खरेदी करणे, प्रभाग क्र. 21 मधील आरक्षण क्रमांक 173 येथे खेळाचे मैदान विकसित करणे, प्रभाग क्र. 1 मधील सोनवणे वस्ती येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे आदी कामासदेखील प्रशासक पाटील यांनी मान्यता दिली.

## संपादकीय »

# तिच्या स्वमर्जीला "सर्वोच्च" मान्यता...

***इज्जत से जिनेका, किसीसे डरना नही... गंगुबाई काठियावाडच्या या दिलखेचक डायलॉगबाजीतून अनेक देहविक्री करणार्या महिलांना हिंमत मिळाली होती.***

देहविक्री व्यवसाय हा जगाच्या प्रत्येक समाज व्यवस्थेत अनादी कालापासून सुरू असलेला व्यवसाय आहे. ग्रीक, रोमन काळ असो वा प्राचीन भारतीय संस्कृती. देहविक्री व्यवसायाचे दाखले आपल्याला बहुसंख्य पुरातन साहित्य वा ग्रंथांमध्ये पदोपदी मिळतात. समाज व्यवस्थेतील अनिष्ट धार्मिक रूढी-परंपरांतूनही या व्यवसायाला चालना मिळाल्याचे म्हटले जात असले तरी आधुनिक काळात प्रामुख्याने दुभंगलेली कौटुंबिक पार्श्वभूमी आणि आर्थिक विपन्नावस्थेतून वाट्याला आलेले दारिद्य्र वा उपासमार ही त्याची प्रमुख कारणे आहेत. अनेकदा अडचणीत आलेल्या स्त्रियांना फसवून, नोकरी किंवा लग्नाची खोटी आमिषे दाखवून कुंटणखान्यात आणून विकले जाते. तर काही अपवादात्मक परिस्थितीत चंगळवादी शहरी संस्कृतीची चटक लागलेल्या काही स्त्रिया या व्यवसायात उतरतात. त्यानंतर या स्त्रीकेंद्रित व्यवसायाची कुंटणखाना चालक, हॉटेल, क्लब, लॉज, दलाल, गिऱ्हाईक अशा अनैतिक धंद्याची मोठी साखळी तयार होते. ज्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते.

या चक्रव्यूहात अनावधानाने अडकलेल्या काही स्त्रीया ही साखळी तोडून बाहेर पडण्यासाठी हातपायदेखील मारतात. परंतु ते एवढे सहजसोपे नक्कीच नसते. अशा वेळेस काही सामाजिक संस्था पोलीस यंत्रणेला हाताशी धरून अशा अबलांच्या मदतीला धावतात. त्यांची सोडवणूक करतात. तर देहविक्री करण्यावाचून इलाज नसलेल्या बहुसंख्य स्त्रीया मात्र शेवटपर्यंत याच व्यवसायाला चिकटून बसतात. तपास यंत्रणांना हाताशी धरून जेव्हा केव्हा अशा प्रकारची कारवाई केली जाते, तेव्हा देहविक्री करणाऱ्या महिलांना मदत होण्याऐवजी या कारवाईत त्यांची चांगलीच ससेहोलपट होते. पोलिसांकडून टाकण्यात येणाऱ्या छाप्यावेळी देहविक्री करणाऱ्या महिलांना अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळते. अनेकदा पोलिसी हिंसाचार त्यांना सहन करावा लागतो.

देहविक्री बेकायदा नसून कुंटणखाना चालवणे बेकायदा आहे. त्यामुळे एखादी सज्ञान व्यक्ती सहसंमतीने हा व्यवसाय करत असेल तर पोलिसांनी तिला अटक किंवा दंड करू नये. देहविक्री करणाऱ्या




## आनंदी सकाळ

# आनंदाचे डोही आनंद तरंग...

घरामध्ये कसे हसूनखेळून मजेत असावे. आपली वृत्ती अशी असावी की, ज्याला आनंद पाहिजे असेल त्याने आपल्याकडे धाव घ्यावी. इतर संपत्ती कितीही दिली तरी पुरे पडत नाही, पण वृत्तीचा आनंद देऊन कधी संपत नाही. जीवन हे मूलतः आनंदमय आहे; सृष्टिक्रमावर सोडले तर ते सुखी होईल. आनंद अत्यंत विशाल आहे. देहबुद्धी मेली म्हणजेच त्याची प्राप्ती होत असते. आनंद मिळविणे हे सोपे आहे, पण हे समजून, आपण सोपे झाले पाहिजे. आपण उपाधीने जड झालो आहोत, म्हणून आपण हलके झाले पाहिजे. सर्व जगाला आनंद हवा असतो. म्हणून कोणत्याही परिस्थितीत आनंद राखावा. आनंद हा शाश्वत आहे, पण आपण विषयातच आनंद मानतो, त्यामुळे खरा शाश्वत आनंद आपल्याला मिळत नाही. फोड आला म्हणजे खाज सुटते, आणि खाजवल्यावर रक्त आले तरी एक प्रकारचा आनंद आपल्याला होत असतो, पण म्हणून खाजवतच राहणे योग्य होईल का? कुत्र्याच्या तोंडात हाड असताना, स्वतःच्या तोंडातले रक्तच तो चघळत असतो. त्यातले काही रक्त जमिनीवर पडून कमीही होत असते. परंतु तो हाडूक काही सोडीत नाही.

# हिंदुत्ववाद्यांच्या अधिक जोरदारपणे भूमिका...



भारतात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे सरकार दुसऱ्यांदा केंद्रात बहुमताने सत्तेत आल्यानंतर देशातील कट्टर हिंदुत्ववाद्यांना नवा जोश आलेला आहे. विशेषत: कट्टर हिंदुत्ववादी नेते आणि संघटना अधिक जोरकसपणे आपली मते मांडताना दिसत आहेत. काही महंत अधिक आक्रमक झालेले दिसत आहेत. या सगळ्यांचे प्रामुख्याने लक्ष्य आहेत ते म्हणजे मुस्लीम नेते. त्यांच्या संघटना आणि त्यांची धार्मिक स्थळे. उत्तर प्रदेशातसुद्धा योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे सरकार दोन वेळा सत्तेवर आले. त्यामुळे तिथेही कट्टर हिंदुत्ववादी अधिक जोरदारपणे आपल्या भूमिका घेऊन पुढे येत आहेत. उत्तर प्रदेशमध्ये ज्ञानवापी मशिदीचा विषय देशभर सगळीकडे गाजत आहे. सर्वोच्च न्यायालयाने ज्ञानवापी मशिदीचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे ते झालेले आहे. त्याचा अहवाल न्यायालयाकडे देण्यात आलेला आहे. हे सर्वेक्षण सुरू असताना झालेल्या व्हिडीओ शूटिंगचा एक व्हिडीओ बाहेर आला. त्यात त्या मशिदीच्या वजूखान्यात असलेल्या कुंडात शिवलिंगाच्या आकाराचे दगडी शिल्प आहे.

हिंदू पक्षकारांचे म्हणणे आहे की ते शिवलिंग आहे, तर मुस्लीम पक्षकार म्हणत आहेत, ते कारंजे आहे. याविषयीचा अहवाल सध्या न्यायालयाकडे आहे. पुढे तो कशाप्रकारे उघड केला जाणार आणि त्याचे पडसाद कसे उमटणार हे येणारा काळच सांगेल. बरेचदा असे होते की एखाद्या गोष्टीमुळे सामाजिक शांतता बिघडणार असेल तर ती युक्तीबाजपणे थंड बस्त्यात ठेवली जाते. हळूहळू लोकांना त्याचा विसर पडत जातो, पण अलीकडच्या काळात हिंदुत्ववाद्यांच्या दाव्यांना प्रतिसाद देणारी सरकारे आल्यामुळे काही जुने मुद्दे पुन्हा मांडून त्याचा निर्णय लागण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ज्ञानवापी मशिदीचा वाद हा काही नवीन नाही. देशभरात धर्मस्थळांवरून काही ठिकाणी असेच वाद वर्षानुवर्षे सुरू आहेत. अलीकडेच ज्याचा निर्णय लागला, असा वर्षानुवर्षे चाललेला वाद म्हणजे अयोध्येतील रामजन्मभूमी आणि बाबरी मशिदीचा. हिंदू धर्मियांचे आराध्य दैवत असलेल्या श्रीरामाचे प्राचीन मंदिर उद्ध्वस्त करून त्या ठिकाणी बाबराने मशीद बांधली. त्यामुळे तिथे पुन्हा श्रीरामाचे मंदिर उभारण्यात यावे, अशी हिंदू संघटनांची मागणी होती. हे प्रकरण अनेक वर्षे न्यायालयात होते. मुस्लीम पक्षकारांचे असे म्हणणे होते की तिथे मंदिर नव्हते. शेवटी न्यायालयाने पुरातत्त्व खात्याच्या सर्वेक्षणाच्या आधारावर निर्णय दिला, तो हिंदूंच्या बाजूने लागला.

# राजकारण म्हणजेच बदमाशांचा शेवटचा अड्डा

**एकामेकांवर जे टोकाचे आरोप करतात, भ्रष्टाचार केल्याचे एकमेकांविरुद्ध कागदोपत्री पुरावे देतात, पाहणाऱ्यांना असे वाटते की जणू काही दोन राष्ट्रांचे एकमेकांविरुद्ध युद्ध सुरू आहे, पण अल्पावधीतच ही मंडळी असे काही रंग बदलतात की तो मी नव्हेच असा त्यांचा पवित्रा असतो.**

राजकीय नेते मग ते कुठल्याही पक्षाचे असोत आपल्या सोयीचे राजकारण करून लोकांना मूर्खात काढतात हे अनेक वेळा दिसून येते, पण जो नागरिक निवडणुकांच्या कालावधीत मतदारराजा असतो, तो मात्र अशा वेळी बिचारा झालेला असतो. त्याच्या हातात काहीही नसते, तो केवळ हतबल असतो. कारण निवडणूक संपल्यावर त्या मतदारराजाचा उपयोगही संपलेला असतो. लोकांनी लोकांचे लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही ही जरी लोकशाहीची आदर्श व्याख्या असली तरी त्याला साजेसे वर्तन लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी करतात का, असा प्रश्न लोकांना नेहमीच पडतो. राजकीय नेतेमंडळी जे झपाट्याने रंग बदलतात, ते पाहिल्यावर लोकांनाही असा प्रश्न पडतो की, काल जे नेते एकमेकांचा शेलक्या विशेषणांनी जाहीरपणे उद्धार करीत होते, जी विशेषणे ऐकल्यावर ऐकणाऱ्यांनाही वीट येत असतो.



एकामेकांवर जे टोकाचे आरोप करतात, भ्रष्टाचार केल्याचे एकमेकांविरुद्ध कागदोपत्री पुरावे देतात, पाहणाऱ्यांना असे वाटते की जणू काही दोन राष्ट्रांचे एकमेकांविरुद्ध युद्ध सुरू आहे, पण अल्पावधीतच ही मंडळी असे काही रंग बदलतात की तो मी नव्हेच असा त्यांचा पवित्रा असतो. नुकताच खासदारांच्या संसदीय समितीचा दौरा लेह लडाख या भागात झाला. या दौऱ्यावर जे खासदार गेले होते, त्यांच्यामध्ये शिवसेनेचे खासदार संजय राऊत आणि अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा यांचाही समावेश होता. नवनीत राणा यांच्यासोबत त्यांचे पती आमदार रवी राणा हेसुद्धा होते. राऊत आणि राणा दाम्पत्य यांच्यामध्ये महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर काय घमासान सुरू आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. उलट त्यांचे जे दररोजचे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत, ते पाहिल्यावर यांना कुणी तरी आवर घालण्याची गरज आहे असे लोकांना वाटते. त्यामुळे लोकांना दरदिवशी त्यांचे आरोप-प्रत्यारोप वृत्तवाहिन्यांवर इच्छा नसतानासुद्धा पाहावे लागतात.

महाराष्ट्रात एकमेकांचा दररोज जाहीर उद्धार करणारी राणा आणि राऊत ही मंडळी थंड हवेच्या ठिकाणी गेल्यावर त्यांच्यात ३६० अंशांचा फरक कसा काय पडला,

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

### संभाजीराजेंच्या माघारीवर छत्रपती शाहूंचा खळबळजनक गौप्यस्फोट

# संभाजीराजेंनी अपक्ष लढावं हा तर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांचा डाव!

## बहुजन मतांच्या विभाजनसाठी भाजपची खेळी, राजेंना संघर्ष करावा लागेल

।कोल्हापूर ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

राज्यसभेच्या सहाव्या जागेवरुन अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या संभाजीराजे छत्रपती यांनी अखेर शुक्रवारी राजकीय लढाईतून माघार घेतल्याचे जाहीर केले आहे. यावेळी संभाजीराजे यांनी शिवसेना आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) यांच्याकडून आपली फसवणूक झाल्याचा आरोप केला. सगळं काही ठरलेलं असताना मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द मोडला, असं म्हणत आपल्या माघारीला त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना जबाबदार धरलं. परंतु या प्रकरणातली सध्याची सगळ्यात मोठी राजकीय घडामोड हाती आलीये. 'संभाजीराजेंनी अपक्ष लढावं ही तर फडणवीसांची खेळी होती', असा मोठा गौप्यस्फोट संभाजीराजे यांचे वडील शाहू छत्रपती यांनी केला आहे.

"मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि माझ्यात राज्यसभा निवडणुकीबाबत प्लॅन ठरला होता. अगदी आमच्या दोघांमध्ये ड्राफ्टही ठरवला गेला. काही मुद्द्यांवर एकमत नसल्याने आम्ही सहमतीने एकमेकांना दोन दिवस विचार करण्यासाठी दिले. पण तोपर्यंत सेनेने वेगवेगळ्या बातम्या पेरल्या. पुढच्या २४ तासांत संजय पवार यांचं नावही जाहीर झालं. मुख्यमंत्र्यांनी माझा शब्द मोडला. उद्धवजी असं वागतील याची मला अपेक्षा नव्हती", असा आरोप करत संभाजीराजेंनी आपण राज्यसभेच्या रिंगणातून माघार घेत असल्याचं जाहीर केलं.



### संभाजीराजेंनी अपक्ष लढावं हा तर फडणवीसांचा डाव

- संभाजीराजेंनी लढण्याआधीच तलवार म्यान केल्याने विविध नेत्यांच्या उलट सुलट प्रतिक्रया येत आहेत. अशातच संभाजीराजेंच्या माघाराविषयी त्यांचे वडील शाहू छत्रपती यांनी पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना राजेंच्या माघारीला फडणवीसांना जबाबदार धरलं आहे. संभाजीराजेंनी अपक्ष लढावं ही विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांची खेळी होती, असा गौप्यस्फोट शाहू छत्रपती यांनी केला आहे. कोल्हापुरातील पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना त्यांनी हा गौप्यस्फोट केला.

### बहुजन मतांच्या विभाजनसाठी भाजपची खेळी

- संभाजीराजेंनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत त्याचं विविध विषयांवर बोलणं झालं. संभाजीराजेंना अपक्ष लढण्यासाठी देवेंद्र फडणवीस आणि भाजपने भाग पाडलं. बहुजन मतांचं विभाजन व्हावं, यासाठी भाजपने ही खेळी खेळली, असा आरोपही शाहू छत्रपती यांनी केला.
- संभाजीराजेंना उमेदवारी न देऊन शिवसेनेने छत्रपती घराण्याचा अपमान केला, अशी टीका विरोधक करत आहेत. विरोधकांच्या या टीकेलाही छत्रपती शाहूंनी उत्तर दिली. "संभाजीराजेंना उमेदवारी दिली नाही म्हणजे छत्रपती

### शॉर्ट न्यूज »

#### मुख्यमंत्र्यांच्या आदेशानेच पॉवरचा दुरुपयोग, हनुमानाने त्यांना सद्बुद्धी द्यावी - नवनीत राणा



।नागपूर ।महाईन्यूज ।

राज्यात हनुमान चालिसा वाद काही संपायला तयार नाही. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा हे आज ३६ दिवसांनंतर राज्यात परतले. राज्यात येऊन त्यांनी नागपुरातील हनुमान मंदिरात जाऊन हनुमान चालिसा पठण केलं. यावेळी नवनीत राणा यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर सडकून टीका केली. "राज्यात जबरदस्ती आणि गुंडशाही सुरुये. पॉवरचा दुरुपयोग केला जात आहे. मी संकटमोचकाकडे प्रार्थना करेन की त्यांनी मुख्यमंत्र्यांना सद्बुद्धी द्यावी आणि त्यांनी महाराष्ट्राचं भलं करावं", असं म्हणत नवनीत राणा यांनी उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका केली

### रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून बँक सुट्ट्यांची यादी जाहीर

# महाराष्ट्रात जून महिन्यात बँकांना सहा दिवस सुट्टी

## 24 दिवसच होणार व्यवहार

मुंबई ।महाईन्यूज ।

बँकशी संबंधीत तुमचे काही महत्त्वाचे काम असल्यास त्याचे आधीच नियोजन करा, कारण जून महिन्यात महाराष्ट्रात सहा दिवस सुट्टी असणार आहे. तुमच्या कामाचा खोळंबा होऊ नये म्हणून आम्ही सुट्ट्यांची यादी देत आहोत. नुकतंच आरबीआयने म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून बँक सुट्ट्यांची यादी जाहीर केली गेली आहे. संपूर्ण जून महिन्यात प्रत्येक राज्यात किती सुट्ट्या आहेत हे या यादीत जाहीर केलेलं आहे. प्रत्येक राज्यातील सणांनुसार बँका बंद राहतात. त्यानुसार योजना आखूनच तुम्ही बँकेमध्ये जा. करोना काळात विविध बँकांची कामं सध्या ऑनलाइन सुरू आहे.

ग्राहकांनी देखील ऑनलाइन प्रणालीचा वापर त्यांच्या दैनंदिन बँकिंग कामासाठी करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान तरी देखील तुम्हाला काही आवश्यक कामासाठी बँकेत जाण्याची आवश्यकता असेल तर बँकाच्या सुट्ट्या तपासूनच बँकेला भेट द्या.



#### सुट्यांची यादी

- ५ जून, रविवार
- ११ जून, दुसरा शनिवार
- १२ जून, रविवार
- १९ जून, रविवार
- २५ जून, चौथा शनिवार
- २६ जून, रविवार

### महिना बदलला की अनेक नियम बदलतात

# 1 जूनपासून बदलणार 5 नियम

## सर्वांच्याच खिशावर होईल परिणाम



।मुंबई ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

मे महिना संपायला अवघे काही दिवस उरले आहेत. सध्या तरी महिना बदलला की अनेक नियम बदलतात. येत्या 1 जूनपासून बदलणाऱ्या या नियमांचा परिणाम थेट तुमच्या खिशावर होणार आहे. जाणून घेऊया या नियमांबद्दल...

**1) गोल्ड हॉलमार्किंगचा दुसरा टप्पा-**
सोन्यामध्ये गोल्ड हॉलमार्किंगचा दुसरा टप्पा 1 जून 2022 पासून सुरू होणार आहे. आता 256 जुन्या जिल्ह्यांव्यतिरिक्त 32 नवीन जिल्ह्यांमध्ये हॉलमार्किंग केंद्र उघडण्यात येणार आहेत. आता या सर्व 288 जिल्ह्यांमध्ये सोन्याच्या दागिन्यांचे हॉलमार्किंग बंधनकारक असेल. आता या जिल्ह्यांमध्ये 14, 18, 20, 22, 23 आणि 24 कॅरेटचेच दागिने विकता येतील. हॉलमार्किंगनंतरच त्यांची विक्री करता येणार आहे.

**2) SBI चे गृहकर्ज महागणार-**

तुम्ही SBI बँकेकडून कर्ज घेण्याचा विचार करत असाल तर 1 जूनपासून तुम्हाला हे कर्ज महाग पडू शकते. SBI ने त्यांचा एक्सटर्नल बेंचमार्क लेंडिंग रेट (EBLR) 40 बेसिस पॉईंट्सने वाढून 7.05 टक्के केला आहे. तर RLLR 6.65 टक्के प्लस CRP असेल.

**3) मोटर विमा प्रीमियम-**
रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अलीकडील अधिसूचनेनुसार, 1000CC पर्यंतच्या इंजिन क्षमतेच्या कारसाठी विमा प्रीमियम 2,094 रुपये असेल. कोविडपूर्वी 2019-20 मध्ये ते 2,072 रुपये होते. त्याच वेळी, 1000CC ते 1500CC कारसाठी विमा प्रीमियम 3,416 रुपये असेल, जो पूर्वी 3221 रुपये होता. म्हणजेच कार विमा महाग होईल.

**4) ऍक्सिस बँकेचे बचत खाते नियम बदलतील-**
ॲक्सिज बँकेने 1 जून 2022 पासून बचत खात्यावरील सेवा शुल्कात वाढ केली आहे. बॅलेन्स मेन्टेन करण्यासाठी मंथली सर्व्हिस फीसचा समावेश केला आहे. NACH अंतर्गत ऑटो डेबिट अयशस्वी झाल्यास 1 जुलैपासून चार्जेस लागू होतील. अतिरिक्त चेकबुकवरही चार्ज लागेल.

**5) सिलिंडरच्या किमती वाढू शकतात-**

1 जूनपासून सिलेंडरच्या किमती वाढू शकतात. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला सिलिंडरच्या किमती निश्चित केल्या जातात.

## शॉर्ट न्यूज »

### हृदयविकाराचा झटक्यामुळे केदारनाथ यात्रेतील दोन भाविकांचा मृत्यू



**। जम्मू-काश्मिर । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

केदारनाथ यात्रेत आणखी दोन भाविकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. हृदयविकाराचा झटक्याने या दोन भाविकांचा मृत्यू झाल्याचे समजते. पटेल धनीश भाई (32) आणि भानू शंकर प्रसाद (71) अशी या मृत भाविकांची नावे आहेत. या यात्रेदरम्यान आतापर्यंत 44 भाविकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, चार धामांपैकी केदारनाथ धाममध्ये सर्वाधिक भाविकांचे मृत्यू झाले असूनही अद्याप आरोग्य विभाग (Medical Department) सतर्क नसल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी केदारनाथ यात्रेला गेलेल्या पटेल धनीश भाई आणि भानू शंकर प्रसाद यांची प्रकृती अचानक बिघडली. पटेल धनीश भाई हे गुजरातचे रहिवाशी असून, भानू शंकर प्रसाद हे पाटण्याचे रहिवाशी आहेत. प्रकृती बिघडल्याने या दोघांना आरोग्य केंद्रात नेण्यात आले.

### भारतीय पुरातत्व विभागाला आदेश जारी करण्याची मागणी

# 100 वर्षांहून अधिक जुन्या मशिदींचे सर्वेक्षण करण्याची मागणी !

### सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



गेल्या काही दिवसांपासून देशभरात मंदिर (Temple) आणि मशिद (Mosque) याच्यावरून वाद सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर आता सर्वोच्च न्यायालयात (Supreme Court) जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशभरात मंदिर (Temple) आणि मशिद (Mosque) याच्यावरून वाद सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर आता सर्वोच्च न्यायालयात (Supreme Court) जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेत '100 वर्षांहून अधिक जुन्या असलेल्या देशातील सर्व प्रमुख मशिदींचे सर्वेक्षण करण्यात यावे', अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, 'यासाठी भारतीय पुरातत्व विभागाला (एएसआय) आदेश जारी करावा', असेही सांगण्यात आले आहे.

'सर्वोच्च न्यायालयाने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण किंवा अन्य कोणत्याही संस्थेला या मशिदींचे सर्वेक्षण करण्याचे आदेश द्यावेत', अशी मागणी या जनहित याचिकेमध्ये करण्यात आली आहे. याशिवाय 100 वर्षांहून अधिक जुन्या मशिदींमधील तलाव आणि विहिरींमधील वजू स्थलांतरित करण्याच्या सूचनाही देण्यात याव्यात. काही अवशेष आढळल्यास जातीय द्वेष आणि धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून ही सर्वेक्षणे गोपनीय ठेवण्याची मागणीही करण्यात आली आहे.

ही जनहित याचिका दिल्ली-एनसीआरचे वकील शुभम अवस्थी आणि सप्तर्षी मिश्रा यांनी अधिवक्ता विवेक नारायण शर्मा यांनी दाखल केली आहे. वाराणसीच्या ज्ञानवापी संकुलातील तलावात/विहिरीत शिवलिंग सापडल्याचा दावा करण्यात

#### याचिकेत अनेक मागण्या

या याचिकेत पुढे म्हटले आहे की मध्ययुगीन काळात मुस्लिम आक्रमकांनी अनेक हिंदू, जैन, शीख आणि बौद्ध मंदिरांची विटंबना केली होती. त्याच वेळी, मशिदी तोडून बांधल्या गेल्या, त्यामुळे या प्राचीन प्रार्थनास्थळांमध्ये अनेक देवी-देवतांचे अवशेष सापडतील, जे इस्लामशिवाय इतर धर्मांचेही असतील.

परस्पर सहकार्य आणि सौहार्दासाठी, या मशिदींमध्ये असलेल्या अवशेषांचा आदर केला पाहिजे आणि प्राचीन धार्मिक अवशेषांची काळजी आणि परतावा यासाठी पावले उचलली पाहिजेत.

# आर्यन खानला जाणीवपूर्वक गोवले

### एनसीबीच्या अंतर्गत अहवालात धक्कादायक दावा

**नवी दिल्ली । महाईन्यूज**



अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान क्रूज ड्रग्ज प्रकरणात निर्दोष असल्याचे सिद्ध झाले आहे. आर्यनच्या विरोधात कोणताही ठोस पुरावा एनसीबीच्या हाती लागलेला नाही. आर्यनला क्लीन चिट मिळाल्यानंतर एनसीबीने त्याला जाणीवपूर्वक गोवले होते, असा दावा एनसीबीच्या अंतर्गत अहवालात करण्यात आला आहे. या अहवालात स्पष्टपणे एकूण चौकशी पाहता, तपास अधिकारी शाहरुखचा मुलगा आर्यनला गुंतवण्याच्या प्रयत्नात होते, असे नमूद करण्यात आले आहे. यामुळे या प्रकरणात एनसीबीचे तत्कालीन मुंबई विभागाचे संचालक समीर वानखेडेंच्या अडचणी वाढनार आहेत. एसआयटीने आपल्या रिपोर्टमध्ये या प्रकरणातील तपास अधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

#### फोन जप्त न करता व्हॉट्सॲप चॅट वाचले-

या प्रकरणातील दुसरा आरोपी अरबाज मर्चंटने ड्रग्जचा आर्यनशी काहीही संबंध नाही, असे सांगितलेले असतानाही, तपास अधिकाऱ्यांनी आर्यन खानचे फोन अधिकृतरित्याजप्त न करताही त्यावरील व्हॉट्सअप चॅट वाचले आणि त्याची माहिती माध्यमांपर्यंतही पोहचली.

#### तपास अधिकाऱ्यांवर प्रश्नचीन्ह –

या प्रकरणात एनसीबीच्या कारवाईत अनेक त्रुटी होत्या, असे एसआयटीच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या सुनावणीत तपास अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येऊ शकते.

#### मुंबई पोलिसांनी केला क्रूझ ड्रग्ज प्रकरणाचा तपास बंद –

एनसीबीने या प्रकरणात आर्यन खानला क्लीन चिट दिली आहे. मुंबई पोलिसांनीही या प्रकरणाचा तपास आता थांबवला आहे. मुंबई पोलीसही या प्रकरणाची चौकशी करीत होते.

### प्रत्येक घरातील एका तरुणाला नोकरी देण्याची घोषणा

# योगी सरकारच्या अर्थसंकल्पात युवकांच्या नोकरीबाबत मोठी घोषणा

### योगी आदित्यनाथ यांच्या दुसऱ्या टर्मचा पहिला अर्थसंकल्प सादर

**। लखनऊ । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

प्रत्येक घरातील एका तरुणाला नोकरी देण्याची घोषणा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली आहे. योगी आदित्यनाथ यांनी दुसऱ्या टर्मचा पहिला अर्थसंकल्प सादर झाला असून, या टर्ममध्ये योगींनी आश्वासनांच्या पूर्ततेकडे वेगाने आगेकूच केल्याचे दिसून येत आहे.

प्रत्येक घरातील एका तरुणाला नोकरी देण्याची घोषणा



उत्तर प्रदेशचे (Uttar Pradesh) मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली आहे. योगी आदित्यनाथ यांनी दुसऱ्या टर्मचा पहिला अर्थसंकल्प सादर झाला असून, या टर्ममध्ये योगींनी आश्वासनांच्या पूर्ततेकडे वेगाने आगेकूच केल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, योगी सरकारच्या दुसऱ्या टर्मच्या अर्थसंकल्पात निराधार महिला, वृद्ध, निवडक विद्यार्थी यांना पेन्शन- स्कॉलरशीप जाहीर केली आहे. याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मतदारसंघासह आपल्या मतदारसंघासाठीही मेट्रोची घोषणा केली आहे.

त्यानंतर विधानसभेत विरोधी पक्षनेत्यांनी रोजगारासंदर्भात प्रश्न विचारला असता योगींनी 'युवकांसाठी सरकार सज्ज आहे, त्यांच्या रोजगारासाठी सरकारने काही योजना तयार केल्या आहेत', असे सांगितले. शिवाय, 'सरकारकडून रोजगार कार्ड जारी करण्यात येणार आहे. त्यानुसार, प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला रोजगार देण्यात येईल. आम्ही पोलीस खात्यात 5 लाख नोकऱ्या दिल्या. पण एकही प्रश्न विचारण्यात आला नाही. योग्यतेनुसार उमेदवारांची तेथे निवड झाली आहे. राज्यात 1 कोटी 61 लाख युवकांना रोजगार देण्यात येणार असून 60 लाख स्वयंरोजगाराचीही योजना आहे', असे योगींनी सांगितले.

#### 6 लाख 15 हजार 518 कोटींचा अर्थसंकल्प

युपीचे अर्थमंत्री विनोद खन्ना यांनी दोन दिवसांपूर्वी 6 लाख 15 हजार 518 कोटींचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात वृद्धांना 1000 रुपये पेन्शन, शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास 5 लाखांची नुकसान भरपाई, विधवा महिलांना 1 रुपये पेन्शन आदी घोषणा केल्या आहेत.

#### अर्थसंकल्पातील प्रमुख घोषणा

अनाथ मुलांना 6 वी ते 12 वी पर्यंत मोफत शिक्षणासाठी 300 कोटी रुपये देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री सामूहिक विवाह योजनेसाठी 600 कोटी रुपये देण्यात आले आहेत.

माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योग धोरणांतर्गत पाच वर्षात 40,000 कोटी रुपयांची गुंतवणूक आणि चार लाख लोकांना रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

बेरोजगारीचा दर जून 2016 मध्ये 18 टक्के होता, तो एप्रिल 2022 मध्ये तो 2.9 टक्क्यांवर आला आहे. 4.22 लाख बेरोजगारांना नोकऱ्या देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

# ‘कभी ईद, कभी दिवाली’ मध्ये करणार ‘या’ अभिनेत्या सोबत रोमांस




**सलमान** खानचा बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित चित्रपट ‘कभी ईद कभी दिवाली’ येत्या काळात प्रर्दशित होणार असून गेल्या अनेक दिवसांपासून या चित्रपटाच्या स्टार कास्टबाबत नवनवीन खुलासे होत आहेत. मागे या चित्रपटातील काही अभिनेते चित्रपटातून बाहेर पडले तर काही नवनवीन अभिनेत्यांची चित्रपटात एन्ट्री सुद्धा झाली. आता नुकत्याच एका माहितीनुसार या चित्रपटातून बिग बॉस १३ फेम अभिनेत्री शहनाज गिलची बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. ‘कभी ईद कभी दिवाली’मध्ये शहनाज गिल पंजाबी अभिनेता आणि गायक जस्सी गिल सोबत रोमांस करताना दिसणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अभिनेत्री शहनाज गिल पंजाबी अभिनेता जस्सी गिल सोबत ‘कभी ईद कभी दिवाली’मध्ये रोमांस करताना दिसणार आहे. या चित्रपटात शहनाज गिल महत्त्वाची भूमिका साकारणार असून यापूर्वी शहनाज गिल आयुष शर्मासोबत रोमांस करताना दिसणार होती मात्र आयुष शर्मा या चित्रपटातून बाहेर पडल्याने शहनाज गिल जस्सी गिलसोबत दिसणार आहे.

## डिसेंबर चित्रपट होणार प्रदर्शित

सूत्रांच्या मते, डांसर राघव जुयाल सुद्धा या चित्रपटामध्ये मालविका शर्मासोबत रोमांस करताना दिसणार आहे. या चित्रपटात सलमान खान आणि पूजा हेगडे मुख्य भूमिकेत असून चित्रपटाचे शूटिंग आता चालू करण्यात आले आहे. येत्या डिसेंबर महिन्यात चित्रपट रिलीज होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# अश्लील सिनेमे पहायची आलिया कश्यप

**बॉलीवूड** दिग्दर्शिक अनुराग कश्यपची मुलगी आलिया कश्यप नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. सोशल मीडियावर तर आलिया खूपच सक्रिय पहायला मिळते. आपल्या वैयक्तिक आयुष्यावरही ती हातचं राखून न ठेवता सगळंच मोकळेपणाने बोलताना दिसते. ती अनेकदा आपल्या चांगल्या-वाईट वैयक्तिक अनुभवावरुन इतरांनाही काही ना काही सांगताना दिसते. एकदा तिनं मासिक पाळी,सेक्स आणि बिकिनी वॅक्स,न्युडिटी अशा अनेक चोरून बोलणाऱ्या विषयांवर बेधडक वक्तव्य करत सोशल



मीडियावर लोकांशी संवाद साधला होता. आता आलियानं पुन्हा एक व्हिडीओ शेअर करीत अनेक समस्यांना सोडवण्याचा एक प्रयत्न केला आहे. या व्हिडीओत तिनं सेक्स(SEX LIFE) करण्या दरम्यान होणाऱ्या वेदना आणि पॉर्न सिनेमांचं(PORN MOVIE) व्यसन याविषयांवर बिनधास्त संवाद साधलाय,अर्थात अनेक खुलासे केलेयत असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही.

आलियाच्या यु-ट्यूब वाहिनीचे 111K सबस्क्रायबर्स आहेत. तिच्या प्रत्येक फोटोवर-व्हिडीओवर लाइक्सचा आणि कमेंट्सचा पाऊस पडत असतो. आपल्या व्हिडीओवरील एखादी प्रतिक्रिया/प्रश्न आलियाला आवडली आणि त्यावर तिला जर उत्तर द्यावंसं वाटलं तर ती थेट

# हेमांगी कवी तब्बल सोळा तास होती झोपेत..




**हेमांगी** कवी हे मराठी मनोरंजन विश्वातील एक महत्वाचं नाव. अनेक मालिका, चित्रपट, नाटक तिच्या कसदार अभिनयाने गाजले आहेत. अभिनयासोबतच निरनिराळ्या कारणाने ती चर्चेत असते. विशेष म्हणजे अभिव्यक्तीच्या आधारावर अत्यंत परखडपणे आपले पुरोगामी विचार लोकांपर्यंत पोहचवत असते. त्यामुळे ती कायमच सोशल मीडियावर आपल्याला सक्रिय दिसते. शिवाय समाज माध्यमातून ती आपल्या चाहत्यांशी संवाद साधत असते. कधी मनमुराद नाच करते तर कधी गमतीशीर व्हिडीओ करते. यंदा मात्र तिने कामामुळे आलेल्या तणावाविषयी भाष्य केले आहे. कामाचा ताण आल्यावर काय होऊ शकते याबाबत तिने एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये तिने झोप किती महत्वाची आहे हे सांगितले आहे. यासोबत तिने काही फोटोज शेअर केले आहेत. या फोटोमध्ये हेमंगी प्रचंड दमलेली आणि थकेलेली दिसत आहे. झोपेतून उठल्यावर एखाद्याची अवस्था असावी तशी हेमांगी दिसत आहे. पण तिचा मूड अत्यंत फ्रेश आहे शिवाय तिने केसात फूल माळले आहे. तर एका फोटोमध्ये ताट भरून फुलं खिडकीपाशी ठेवली आहेत. हे फोटो

# महेश मांजरेकर दिग्दर्शित ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’



**२८ मे** रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती साजरी केली जाते. याचं दिवसाचे अवचित्य साधत महेश मांजरेकर दिग्दर्शित ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची घोषणा करण्यात आली. सोशल मीडियावर या चित्रपटाचे पहिले पोस्टर देखील प्रदर्शित करण्यात आले आहे, चित्रपटाची घोषणा करत महेश मांजरेकरांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर चित्रपटाचे पोस्टर शेअर केले असून, या चित्रपटात सावरकरांची भूमिका अभिनेता रणदीर हुड्डा साकारणार असल्याची माहिती दिली आहे.




महेश मांजरेकर यांनी ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ यांच्या जयंतीच्या शुभेच्छा देत खाली कॅप्शनमध्ये लिहिलंय की, “सावरकरांबद्दल लोकांच्या मनात वेगवेगळे विचार असू शकतात पण एक चित्रपट निर्माता म्हणून पण मी सावरकरांच्या विचारांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे चित्रपटाची कथा आणि व्यक्तिरेखा यात सावरकर जसे होते, यापेक्षा काही वेगळा फरक असणार नाही. मात्र ते एक स्वातंत्र्यसैनिक होते आणि त्यांना विसरता येणार नाही.” अभिनेता रणवीर हुड्डाने देखील चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडयावर शेअर करत खाली कॅप्शनमध्ये लिहिले की,”मला आशा आहे की एका खऱ्या क्रांतिकारकाची भूमिका करण्याचे आव्हान मी पेलू शकेन आणि त्यांची खरी कहाणी सांगू शकेन जी दीर्घकाळासाठी दडवून ठेवली गेली होती.” मात्र रणदीप हुड्डाच्या पहिल्या लुकचे सोशल मीडियावर जेवढे कौतुक होत आहे, तेवढेच ही भूमिका स्विकारल्याने त्याच्यावर टीका देखील केली जात आहे. सोशल मीडियावर रणदीपला ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. संदीप सिंह आणि अमित वाधवानी यांनी ‘स्वातंत्र्यावीर सावरकर’ चित्रपटाची निर्मिती केली आहे. आनंद पंडित मोशन पिक्चर्स आणि लिजेंड स्टुडिओज द्वारे ‘स्वातंत्र्यावीर सावरकर’ चित्रपट प्रस्तुत केला जात आहे.

# बहुचर्चित ‘इर्सल’ चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला

**निवडणुका** आणि राजकारणातल्या साजूक मुखवट्या मागचं भयाण वास्तव दाखवणाऱ्या ‘इर्सल’ या मराठी चित्रपटाचा उत्कंठावर्धक ट्रेलर मोठ्या उत्साहात, दिमाखदार सोहळ्यात लॉंच करण्यात आला. भलरी प्रोडक्शनची निर्मिती आणि राज फिल्मची प्रस्तूती असलेला ‘इर्सल’ या चित्रपटाचे दिग्दर्शन अनिकेत बोंद्रे–विश्वास सुतार यांनी केले आहे. हा मराठी चित्रपट त्याच्या हटके नावामुळे आणि लाक्षवेधी पोस्टरमुळे सध्या चर्चेत आहे. लॉंच झालेल्या ट्रेलर वरून हा चित्रपट राजकारणातील कावेबाज माणसांच्या इर्षेची धूळवड दाखवणार असल्याचे दिसते.

‘इर्सल’ चित्रपटात डॉ. मोहन आगाशे, शशांक शेंडे, अनिल नगरकर, सुजाता मोगल, अभिनेत्री माधुरी पवार, शरद जाधव, अजिंक्य निकम, विश्वास सुतार, संजय मोहिते, आदर्श गायकवाड, दिग्विजय कालेकर, सुधीर फडतरे, ओंकार भस्मे, केतन विसाळ, हर्षाली रोडगे, नागेश नाईक, आकाश भिकुले, वैशाली घोरपडे, चैताली बर्डे, अप्पासाहेब कुंडले, सर्जेराव जाधव, हनिफ शेख या कलाकारांच्या भूमिका आहेत. तर ट्रेलर आणि गाण्यांमधून लक्ष्यवेधून घेणारी विक्रम सूर्यकांत आणि शिवानी मोझे पाटील ही फ्रेश जोडी पदार्पण करत आहे. ‘इर्सल’ या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये राजकारणामधील खालच्या फळीत घडामोडी दिसतात. स्थानिक राजकारण आणि विविध समाजघटकांवर या राजकीय घडामोडींचा होणारा परिणाम यांची झलक या पहायला मिळते. अगदी टीनएजर्स मुलांपासून राजकारणातील बुजुर्ग नेत्यांपर्यंत निवडणूक काळात नेमकं काय काय घडतं हे या चित्रपटात पाहायला मिळणार असल्याचे दिसते. ‘इलेक्शन म्हणजे समदा डाकू लोकांचा खेळ असतोय’, ‘इथला भाय कोणचं नाय’, ‘नाद केला ना तर बाद करीन’ किंवा ‘एकदा पाखरू उडालं ना की त्याचा नाद सोडून द्यायचा’, तिकीट, पक्ष असल्या कुबड्या बांडगुळांनाचं

### विद्यापीठातील क्रीडा संकुलाला दिले पै.खाशाबा जाधव यांचे नाव

# देशात खेलो इंडियाची 1 हजार केंद्र बनावी

### केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांचे प्रतिपादन

। पुणे । महाईन्यूज ।

मल्लखांब, कबड्डी यांसारखे मातीतले स्थानिक खेळ जागतिक पातळीवर पोहोचण्याची क्षमता आहे. 'खेलो इंडिया' च्या माध्यमातून अनेक खेळाडू पुढे आले. ४५० केंद्रांना मान्यताही मिळाली आहे तर भारतात 'खेलो इंडिया' ची एकूण १००० केंद्र निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे प्रतिपादन केंद्रीय क्रीडा व युवक कार्यक्रम मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील २७ एकरातील क्रीडा संकुलाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असलेले पै.खाशाबा जाधव यांचे नाव देण्यात आले. यासोबतच पै.खाशाबा जाधव आणि युवकांचे प्रेरणास्थान म्हणून स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्यांचे अनावरणही अनुराग ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.





> ही मैदाने कधीही रिकामी राहता कामा नये. सातत्याने येथे विविध स्पर्धा व्हायला हव्यात. विद्यापीठ स्तरावर महाराष्ट्रात स्पर्धांचे आयोजन करावे यासाठी केंद्राकडून त्यांना सर्वोतोपरी मदत केली जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. मागच्या वर्षीपर्यंत खेळाचे बजेट ६५७ करोडचे होते ते आता ९७० पर्यंत वाढविण्यात आले आहे. तसेच चांगल्या खेळाडूंना आम्ही पाच लाखापर्यंत अनुदानही देऊ.
>
> **अनुराग ठाकूर,** केंद्रीय क्रीडा व युवक कार्यक्रम मंत्री

या कार्यक्रमाला खासदार गिरीश बापट, आमदार सिद्धार्थ शिरोळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य सुनेत्रा पवार, राजेश पांडे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. दीपक माने, खाशाबा जाधव यांचे सुपुत्र रणजित जाधव, ओलिम्पिक विजेते खेळाडू अंजली भागवत, मारुती आडकर, रेखा भिडे आणि मनोज पिंगळे आदीही यावेळी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी योग प्रात्यक्षिके सादर केली. मूर्तिकार संजय परदेशी आणि विवेक खटावकर यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले.

डॉ. कारभारी काळे म्हणाले, विद्यापीठाने शिक्षण क्षेत्रात जागतिक पातळीवर नाव मिळवले आहे. या क्रीडा संकुलाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण होतील. या संकुलात खेड्यापाड्यातील, सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन केले जाईल. महाष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना या सुविधा उपलब्ध होतील.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राजेश पांडे म्हणाले, विद्यापीठाचा परिसर हा ४०० एकरपेक्षा जास्त आहे त्यातील २७ एकर परिसरात हे क्रीडा संकुल उभारण्यात येत आहे. यासाठी साधारण ९० कोटींपेक्षा जास्त खर्च झाला आहे. इथे देण्यात आलेल्या सर्व सुविधा व सामग्री या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आहेत. या क्रीडासंकुलाच्या उभारणीत अनेक माजी कुलगुरूंचे योगदान आहे.

डॉ. प्रफुल्ल पवार यांनी पाहुण्यांचं स्वागत केलं तर व्यवस्थापन परिषद डॉ. संजय चाकणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आभार दीपक माने यांनी आभार मानले.



# 'विराट कोहली आणि सेहवागने पंच म्हणून मैदानात यावे'

### माजी ऑस्ट्रेलियन पंचाने व्यक्त केली इच्छा

। मेलबर्न । महाईन्यूज ।

ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडूंप्रमाणे ऑस्ट्रेलियन क्रिकेट पंचदेखील चर्चेचा विषय ठरत असतात. ऑस्ट्रेलियाचे माजी पंच सायमन टॉफेल हे यापैकीच एक आहेत. क्रिकेटमधून निवृत्त झालेले सायमन आता पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. त्यांनी भारतातील काही आजी-माजी दिग्गज खेळाडूंना सामन्यात पंचाची जबाबदारी पार पाडण्याचा सल्ला दिला आहे. विशेष म्हणजे यामध्ये भारताचा माजी कर्णधार आणि स्फोटक फलंदाज विराट कोहलीचाही समावेश आहे.

सायमन टॉफेल यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या क्रिकेट अकादमीच्या सहकार्याने दुबईमध्ये ऑनलाइन 'अंपायरिंग' प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम पंच होण्यासाठी आवश्यक असलेल्या तीन स्तरांच्या मान्यता प्रदान करतो. हा अभ्यासक्रम नवशिक्यांपासून सध्या कार्यरत असलेल्या व्यावसायिक पंचांपर्यंत, अशा सर्वांसाठी खुला आहे. त्यांच्या उपक्रमाबाबत न्यूज ९ स्पोर्ट्सला एक मुलाखत दिली. सायमन टॉफेल यांना भविष्यात पंच म्हणून कोणत्या खेळाडूंना बघायला आवडेल, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी मॉर्नी मॉर्केल, विरेंद्र सेहवाग, विराट कोहली आणि रविचंद्रन अश्विन यांची नावे घेतली. सायमन यांच्या मते, या खेळाडूंकडे क्रिकेटचे पुरेसे ज्ञान आहे. त्यामुळे ते अतिशय उत्तमरित्या पंचांचे काम करू शकतात.

> सायमन यांच्या मते, 'पंचाची जबाबदारी पार पाडणे प्रत्येकाला शक्य होईलच असे नाही. मात्र, विरेंद्र सेहवाग, विराट कोहली आणि रविचंद्रन अश्विन यांच्याकडे असे गुण आहेत. विशेषत: विरेंद्र सेहवागला पंच म्हणून मैदानात उभे राहिलेले बघायला त्यांना आवडेल. त्याला क्रिकेटचे नियम आणि खेळातील विविध परिस्थितींची चांगलीच माहिती आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही